## सत्र ३ : घटक २

# आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या अध्ययनाचे दृष्टीकोन

**अनुक्रमणिका**

२.० उद्दिष्टे

२.१ प्रास्ताविक

२.२ विषय विवेचन

  २.२.१ निर्णय निर्धारण दृष्टीकोन

  २.२.२ मॉर्टन कॉप्लॉन यांचा व्यवस्था दृष्टिकोन

  २.२.३ खेळ सिद्धांत

२.३ पारिभाषिक शब्द

२.४ सरावासाठी प्रश्न

## २.० उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर आपणाला-

- आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या अध्ययनाचा निर्णय निर्धारण दृष्टिकोन समजून येईल.
- मॉर्टन कॉप्लॉन यांचा आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या अध्ययनाचा व्यवस्था दृष्टिकोन समजून येईल.
- आंतरराष्ट्रीय राजकारणातील खेळ सिद्धांत समजून येईल.

## २.१ प्रास्ताविक

आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या व्याप्तीत दुसऱ्या महायुद्धांच्या समाप्तीनंतर प्रचंड वाढ व बदल झाले आहेत. दुसऱ्या महायुद्धानंतर आंतरराष्ट्रीय राजकारणात अनेक दृष्टिकोन/सिद्धांत विकसित झाले. कोणत्याही विषयाच्या अभ्यासासाठी उपयोगात आणल्या गेलेल्या विविध पद्धती म्हणजे त्या विषयाचे अध्ययनाचे दृष्टिकोन होय. हे दृष्टिकोन म्हणजे आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या अनेक अभ्यासकांनी या विषयाचे स्वरूप स्पष्ट करण्यासाठी वापरलेल्या पद्धती होय.

आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या अध्ययनाच्या अभ्यासाचे दोन मुख्य दृष्टीकोन आहेत. ते म्हणजे १) परंपरागत दृष्टिकोन. २) आधुनिक दृष्टिकोन होय. ही विभागणी सर्वप्रथम हेडले बूल यांनी केली.

तर दुसऱ्या महायुद्धापूर्वीच्या काळात आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या विषयाच्या अध्ययनाचे दोन दृष्टिकोन होते. ते म्हणजे आदर्शवादी व वास्तववादी दृष्टिकोन होय.

**आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या अध्ययनाचे दृष्टिकोन**

| **पारंपारिक / परंपरागत दृष्टिकोन** | **आधुनिक दृष्टिकोन** |
|---|---|
| १) ऐतिहासिक दृष्टिकोन | १) वर्तनवादी दृष्टिकोन |
| २) तात्विक दृष्टिकोन | २) व्यवस्था दृष्टिकोन |
| ३) वैधानिक दृष्टिकोन | ३) निर्णय निर्धारण दृष्टिकोन |
| ४) संस्थात्मक दृष्टिकोन | ४) खेळ सिद्धांत |

## २.२ विषय विवेचन

प्रस्तुत प्रकरणामध्ये आपण आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या अध्ययनाच्या दृष्टिकोनापैकी निर्णय निर्धारण दृष्टिकोन, मॉर्टन कॉप्लॉन यांचा व्यवस्था सिद्धांत, खेळ सिद्धांत व

या दृष्टिकोनाचा अभ्यास करणार आहोत.

### २.२.१ निर्णय निर्धारण दृष्टिकोन

**अ) प्रास्ताविक**

निर्णय निर्धारण दृष्टिकोनाला निर्णयग्राही असे ही म्हणतात. निर्णय घेणे हे मानवी जीवनातील एक दैनंदिन व महत्वाचे कार्य आहे. प्रत्येक व्यक्ती अनेक क्षेत्रांत निर्णय घेत असते. तर राजकीय क्षेत्रात घेतलेल्या निर्णयाचे परिणाम व्यापक असलेले दिसतात. निर्णय सिद्धांत १९५० व १९६० च्या सामाजिक शास्त्रामधील वर्तनवादी क्रांतीनंतर राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, समाजशास्त्र व मानसशास्त्रात लोकप्रिय झाला. या सिद्धांताचा वापर विल्यम रिकर, जेम्स रॉबिन्सन, हर्बर्ट सायमन यांनी केला. निर्णय ग्राही दृष्टिकोन निवडणूकीतील मतदान, लोकमत व न्यायालयीन निवाडे इत्यादीच्या विश्लेषणासाठी प्रथम वापरला गेला.

आंतरराष्ट्रीय संबंधामध्ये निर्णय निर्मिती सिद्धांताचा सर्वप्रथम वापर रिचर्ड स्नायडर, एच. डब्ल्यू. ब्रुक व बर्टोन सपीन या अभ्यासकांनी केला. त्यांचा उद्देश आंतरराष्ट्रीय राजकारणात राष्ट्रांच्या क्रिया-प्रतिक्रियांना प्रभावित करणाऱ्या घटकांचे स्पष्टीकरण करणे हा होता.

**ब) अर्थ व स्वरूप**


राष्ट्रे ही आंतरराष्ट्रीय संबंधाचा केंद्र घटक आहेत. आंतरराष्ट्रीय संबंधात राष्ट्रा-राष्ट्रांच्या परस्पर संबंधाचा अभ्यास केला जातो. निर्णय प्रक्रियेतून हे संबंध वाढत जातात. चांगल्या, फायदेशीर संबंधाच्या दृष्टिने योग्य निर्णय घेणे आवश्यक असते. म्हणूनच राष्ट्राराष्ट्रातील परस्पर संबंधाचा अभ्यास करणे म्हणजे निर्णय निर्मिती सिद्धांताचा वापर करणे असा अर्थ सांगता येतो.

रॉबिन्सनच्या मते, निर्णय निर्मिती एक सामाजिक प्रक्रिया असून त्यात कमीत कमी पर्यायामधून निर्णय घेण्यासाठी एखादी समस्या निवडली जाते आणि अंमलबजावणीसाठी निर्णय घेतले जातात. निर्णय निर्मिती सिद्धांतामध्ये परराष्ट्र धोरणाचे उद्दिष्ट, कार्य, निर्णयनिर्मितीची तत्वे, प्रक्रिया, साधने, अंतर्गत व बाह्य घटकाचा समावेश होतो. आंततराष्ट्रीय संबंधात राष्ट्रांमध्ये परराष्ट्र व्यवहाराविषयी निर्णय कोण घेते? कसा घेते? कोणत्या परिस्थितीमध्ये घेतला जातो? तो निर्णय कोणत्या निकषांवर घेतला जातो? या सर्व गोष्टींच्या विश्लेषणावर निर्णय निर्धारण सिद्धांत भर देतो. या सिद्धांतात निर्णय घेणाऱ्याची विचारसरणी, भूमिका, उद्देश, त्याची आर्थिक, सामाजिक परिस्थिती, त्याच्यावर येणारे दबाव याचाही विचार केला जातो. त्यानंतर निर्णय घेणे, त्यावर आधारित कृतीसाठी पुढाकार घेऊन संरचनाचे अभिज्ञान करणे, निर्णयनिर्मिती वर्तनाचे पद्धतशीर क्रमबद्ध विश्लेषण करणे या गोष्टींना प्राधान्य दिले जाते.

हर्बर्ट सायमनच्या मते, निर्णय घेणे हे प्रशासनातील अत्यंत महत्वाचे कार्य आहे. म्हणूनच राजकारण म्हणजे अव्याहत निर्णय घेण्याचे शास्त्र आहे असे देखील म्हटले जाते.

### क) निर्णयाची प्रक्रिया व त्यावरील विभिन्न प्रभाव

निर्णय निर्धारण दृष्टिकोनाने राज्याला प्रमुख निर्णायक केंद्र मानले आहे. आंतरराष्ट्रीय राजकारणात निर्णय घेताना कोणकोणत्या घटकांचा प्रभाव पडतो या विविध घटकांचा विचार या सिद्धांताने केला आहे. ते घटक पुढीलप्रमाणे आहेत.



### १) अंतर्गत परिस्थिती

राष्ट्राच्या परराष्ट्र धोरणावर व निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत राष्ट्रांतर्गत घटकांचा प्रभाव पडतो. अंतर्गत घटकांमध्ये राष्ट्राची भौगोलिक, नैसर्गिक स्थिती, हवामान, राष्ट्रातील लोकमत, विविध विचार प्रवाह व गट, शासनातील प्रभावी व्यक्ती, राजकीय पक्ष, दबावगट, राष्ट्राची तांत्रिक, भौतिक स्थितीचा समावेश होतो. या घटकांकडे राष्ट्र दुर्लक्ष करू शकत नाही.

### २) कार्यकारी मंडळ व कायदेमंडळाचा प्रभाव

आंतरराष्ट्रीय पातळीवरील निर्णय राष्ट्रातील नेतृत्व घेत असले तरी त्यामागे संपूर्ण कार्यकारिणीचा सहभाग असतो. ही कार्यकारिणी कायदेमंडळाच्या संमतीने निर्णय घेत असते. त्यामुळे आंततराष्ट्रीय पातळीवरील निर्णय निर्धारक प्रक्रियेवर कार्यकारी व कायदेमंडळाचा प्रभाव पडताना दिसतो. उदा. वुड्रो विल्सन यांची इच्छा असताना देखील अमेरिकन सिनेटच्या विरोधामूळे अमेरिका राष्ट्रसंघाची सभासद होऊ शकली नाही. याबाबत डेव्हिड ईस्टन म्हणतात की, 'निर्णय म्हणजे राजकीय व्यवस्थेतील आऊटपूट Output होय'. त्याचा दूरगामी परिणाम संपूर्ण जागतिक वातावरणावर होत असतो.

### ३) व्यक्तिमत्वाचा प्रभाव

राष्ट्राची निर्णय प्रक्रिया ही व्यक्तिनिष्ठ स्वरूपाची असते. परीणामी निर्णय घेणारी व्यक्ती बदलली की, निर्णय निर्धारणात बदल होऊ शकतो. कारण निर्णय निर्धारकाच्या व्यक्तीमत्वाचा प्रभाव त्या निर्णयावर पडतो. उदा. पंडीत नेहरूंच्या विचारांचा प्रभाव पंचशील धोरणांत जाणवतो. तसेच विविध राष्ट्रांतील नेतृत्वाचा विचार केल्यास त्यांनी घेतलेले निर्णय समजून घेणे सोपे जाईल.

### ४) बाह्य परिस्थिती

राष्ट्राला परराष्ट्र धोरण ठरविताना किंवा आंतरराष्ट्रीय राजकारणात निर्णय घेताना राष्ट्राबाहेरील जागतिक संघटना, जागतिक लोकमत, बड्या शक्तींचे राजकारण व त्यांच्या सैनिकी संघटना इत्यादी घटकांचा विचार करणे आवश्यक असते. कारण वरील गोष्टींकडे दुर्लक्ष केल्यास भविष्यात त्याचे विपरीत परिणाम राष्ट्रावर होऊ शकतात.

### ५) वातावरणाचा परिणाम

कोणताही सिद्धांत/ दृष्टिकोन शास्त्रामध्ये मांडताना 'बाह्य परिस्थिती किंवा वातावरण स्थिर असताना' असे म्हटले जाते. याचे कारण सिद्धांत ज्या वातावरणात अस्तित्वात असतो ते वातावरण बदलले की सर्व परिस्थिती बदलते व सिद्धांताची उपयुक्तता नष्ट होते. म्हणूनच प्रत्येक गोष्टीला विशिष्ट पूरक वातावरण गरजेचे असते. तर निर्णय त्याच पद्धतीने ज्या वातावरणात घेतले जातात, त्या वातावरणाचा प्रभाव त्या निर्णयावर निश्चितपणे दिसतो. उदा. शांतता काळात घेतलेला निर्णय व अस्थिर वातावरणात घेतलेला निर्णय यात फरक आढळतो. तसेच एकाच राष्ट्राबद्दल दोन वेगवेगळ्या राष्ट्राचे मत यात फरक दिसतो. जसे भारत रशियाला मित्र समजतो. तसे अमेरिका समजत नाही. कारण भारताची मनोवैज्ञानिक स्थिती ही रशियाद्वारे मिळणाऱ्या सहकार्यपूर्ण वातावरणाचा परिणाम आहे. याउलट अमेरिकेला असलेली भीती ही त्याच्या भीतीयुक्त वातावरणाचा परिणाम आहे.

### ड) मूल्यमापन

आंतरराष्ट्रीय राजकारणात निर्णय निर्धारण दृष्टिकोनाला महत्वाचे स्थान आहे. त्यावर त्या राष्ट्राचे भवितव्य ठरत असते. निर्णय निर्धारण दृष्टिकोनाने पुढील महत्वाचे मुद्दे स्पष्ट केले.

१) आंतरराष्ट्रीय राजकारणाचा अभ्यास परंपरागत पद्धतीने न करता तो वर्तमानकाळात निर्धारित केलेले धोरण व भविष्यात त्याचे होणारे परिणाम या दृष्टिने केला पाहिजे. हे या दृष्टिकोनाने प्रथम स्पष्ट केले.

२) समाजशास्त्र व मानसशास्त्रातून घेतलेल्या उपयुक्त संकल्पणांवर निर्णय निर्धारण दृष्टिकोन आधारलेला आहे. त्यामुळे या दृष्टिकोनाला आंतरराष्ट्रीय (Inter Diciplinary) दृष्टिकोन म्हणून महत्वाचे स्थान प्राप्त झाले आहे.

३) अनेक राष्ट्रांच्या परराष्ट्र धोरणांचा तुलनात्मक व विश्लेषणवादी अध्ययन करून कोणत्याही राष्ट्राला योग्य असे परराष्ट्र धोरण ठरविण्यास हा दृष्टिकोन फायदेशिर ठरला आहे.

अशा प्रकारे निर्णय निर्धारण दृष्टिकोनाने आपली उपयुक्तता स्पष्ट केली आहे. असे असले तरी निर्णय निर्धारण दृष्टिकोनात काही उणिवा दिसतात त्या पुढीलप्रमाणे आहेत.

#### १) निर्णयाचे विश्लेषण होत नाही

या दृष्टिकोनात निर्णय घेण्याची प्रक्रिया या त्यावर प्रभाव टाकणाऱ्या घटकांचा अभ्यास केला आहे. परंतू निर्णय घेतल्यानंतर त्याचे परिणाम काय होतील? घेतलेला निर्णय योग्य आहे की अयोग्य आहे? याचे विश्लेषण केले जात नाही.

#### २) प्रमुख घटकांकडे दुर्लक्ष

निर्णय निर्धारण दृष्टिकोनाने सत्ता संतुलन व आंतरराष्ट्रीय कायदे या प्रमुख घटकांकडे दुर्लक्ष केले. परंतू हे दोन घटक परराष्ट्र धोरणात महत्वाचे असतात.

#### ३) माहितीची अचूकता अशक्य

हा सिद्धांत उपलब्ध माहितीवर भाष्य करतो. परंतू ती माहिती विश्वासार्ह आहे का? याची तपासणी करीत नाही. अशावेळी जर माहिती अचूक नसेल तर निर्णय चूकीचे होऊ शकतात.

#### ४) गुंतागुंतीचे अध्ययन

राष्ट्राचे परराष्ट्र धोरण अनेक घटकांवर आधारलेले असते. शिवाय त्यावर अनेक घटना, गोष्टी व घटकांचा प्रभाव पडत असतो. परिणामी या सर्वांचा संबंध निर्णय निर्धारणाशी येतो. त्यामुळे हे अध्ययन गुंतागुंतीचे बनते.

अशा प्रकारची टीका या दृष्टिकोनावर होते. तसेच निर्णय निर्धारण दृष्टिकोनाने आंतरराष्ट्रीय राजकारणाचे पूर्ण आकलन होत नाही. शिवाय ही प्रक्रिया विवेकशील नाही. त्यात व्यक्तीमत्वाला अवास्तव महत्व दिले जाते अशीही टीका केली जाते. असे असले तरी या दृष्टिकोनाने परराष्ट्र धोरण निर्धारणात महत्वाची भूमिका पार पाडली आहे. हे विसरून चालणार नाही स्टँन्ले हॉफमन याविषयी

म्हणतात की, 'निर्णयग्रहणाचे अध्ययन करण्याच्या दृष्टिने हा दृष्टिकोन महत्वाचा आहे. परंतू आंतरराष्ट्रीय राजकारणाचे संपूर्ण अध्ययन करण्यासाठी तो फारसा उपयुक्त ठरत नाही.'

## २.२.२ मॉर्टन कॉप्लॉन यांचा व्यवस्था दृष्टिकोन

### अ) प्रास्ताविक

आंतरराष्ट्रीय व्यवस्था दृष्टिकोनाचा मुख्य प्रवर्तक म्हणून मॉर्टन कॉप्लॉन यांचा उल्लेख केला जातो. त्यांनी आंतरराष्ट्रीय राजकारणातील प्रमुख घटकांच्या म्हणजेच राष्ट्रांच्या वर्तनाचे स्पष्टीकरण देण्यासाठी विश्लेषणात्मक साधन म्हणून व्यवस्थेचा उपयोग करून घेतला आहे. कॉप्लॉन यांच्या मते, व्यवस्था दृष्टिकोनामुळे आपणाला आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या सर्व पैलूंचे चांगल्या प्रकारे आकलन होऊ शकते.

### ब) आंतरराष्ट्रीय व्यवस्थेचे स्वरूप

मॉर्टन कॉप्लॉन यांच्या मते, आंतरराष्ट्रीय व्यवस्था ही सर्व समावेशक आहे. आंतरराष्ट्रीय व्यवस्थेत अशा आंतरक्रियांचा अंतर्भाव होतो की, ज्या पूर्णतः सहकार्याच्या नाहीत किंवा संघर्षाच्या देखील नाहीत. परिणामी त्या समजून घेणे कठीण बनते. तसेच आंतरराष्ट्रीय व्यवस्थेच्या काही उपव्यवस्थाही असतात. यासर्व व्यवस्थेतील प्रमुख घटक म्हणजे राष्ट्रीय व उच्चतम राष्ट्रीय घटक होय.

आंतरराष्ट्रीय व्यवस्थेत राष्ट्रांच्या अंतर्गत व्यवस्थेत होणाऱ्या बदलांचे आंतरराष्ट्रीय व्यवस्थेवर कोणते परिणाम होतात आणि आंतरराष्ट्रीय व्यवस्थेत होत असलेल्या बदलांमूळे त्या व्यवस्थेच्या घटकांच्या म्हणजेच राष्ट्राच्या वर्तनात कोणते व कसे बदल घडून येतात, याचा विचार व्यवस्था दृष्टिकोनात केला जातो. प्रामुख्याने हा दृष्टिकोन संरचना व त्याच्या कार्यावर भर देतो.

### क) कॉप्लॉनचा व्यवस्था दृष्टिकोन

मॉर्टन कॉप्लॉन यांनी आंतरराष्ट्रीय संबंधात क्रियाशील असणाऱ्या पाच चल घटकांची मांडणी केली आहे ते पुढील प्रमाणे आहेत.

### १) व्यवस्था नियमात्मक चलिते

राज्यकर्ते व नागरिक यांच्यातील सामाजिक व राजकीय संबंध दाखविणाऱ्या चलितांचा निर्देश करण्यासाठी कॉप्लॉनी 'व्यवस्था नियमात्मक चलिते' असा शब्दप्रयोग केला आहे. साम्राज्यात परकीय शासक व देशी शासीतांतील संबंध आणि स्वतंत्र देशात राज्यकर्ते आणि नागरिकांत भेद असतो. पाहिल्या प्रकारात शासक परकीय असून शासक व शासित यांतील संबंध सत्ताधीश व गुलामांसारखे असतात, तर स्वतंत्र देशात हे संबंध स्वदेशाप्रमाणे असतात. या दोन भिन्न सामाजिक, राजकीय संबंधाचा आंतरराष्ट्रीय राजकारणावर भिन्न प्रभाव पडतो.

### २) परिवर्तन नियमदर्शक चलिते

काही व्यवस्थामध्ये परिवर्तनाचे नियम अंतर्भूत केलेले असतात. देश, काल, परिस्थिती नुसार हे नियम असतात. अशा राष्ट्रातील व्यवस्थेमध्ये या नियमानुसार परिवर्तने होतात. परंतू काही

व्यवस्थामध्ये या प्रकारे परिवर्तनाचे नियम अंतर्भूत नसतात. अशा स्थितीत व्यवस्थेत परिस्थितीनुरूप परिवर्तन नियम विकसित होतात. वेगवेगळया व्यवस्थांमध्ये अंतर्भूत नसलेले, परंतू परिस्थितीनुरूप विकसित होणारे परिवर्तन नियम आंतरराष्ट्रीय राजकारणावर निरनिराळे प्रभाव टाकतात.

### ३) राज्य वर्गदर्शक चलिते

राज्यशास्त्रात राज्याचे वर्गीकरण लोकशाही, हुकूमशाही, राजेशाही, महाजनसत्ता, अल्पजनसत्ता अशा शासन प्रकारानुसार केले जाते. त्या शासन प्रकारानुसारच राज्याचे आंतरराष्ट्रीय स्तरावरचे वर्तन निश्चित होते. जसे लोकशाही शासनाचे राज्य बहुधा शांततामय मार्गाचा वापर करते तर हुकूमशाही देशांत सत्ताप्रदर्शनावर भर असते. अशाप्रकारे राज्य प्रकारांचा म्हणजे राज्य वर्गदर्शक चलितांचा प्रभाव आंतरराष्ट्रीय संबंधाच्या अभ्यासात महत्वपूर्ण ठरतो.

### ४) क्षमता दर्शक चलिते

राज्याची क्षमता म्हणजे युद्ध किंवा संरक्षण सामर्थ्य होय. क्षमतेमध्ये औद्योगिक, विज्ञान व तंत्रज्ञानविषयक प्रगती, दळणवळण साधनांचा विकास, जनतेतील देशप्रेम व देशाप्रती त्यागवृत्ती यावर देशाची क्षमता व सामर्थ्य अवलंबून असते. आंतरराष्ट्रीय परीस्थीतीस एखादे राज्य कसा प्रतिसाद देईल हे त्यांच्या क्षमतेवर किंवा सामर्थ्यांवर अवलंबून असते. म्हणून क्षमतादर्शक चलितांचा विचार आंतरराष्ट्रीय संबंधाच्या अध्ययनात महत्वाचा ठरतो.

### ५) माहितीदर्शक चलिते

राष्ट्राजवळ उपलब्ध माहितीवरून ते आंतरराष्ट्रीय राजकारणात वर्तन करत असते. म्हणून आंतरराष्ट्रीय शांतता व तणाव हे उपलब्ध वास्तवापेक्षा त्याविषयीच्या माहितीवर अवलंबून असतात. उदा. राज्याचे सामर्थ्य ही एक सापेक्ष बाब आहे. एखादे राष्ट्र एखाद्या शेजारी राज्याच्या तुलनेत बलवान असेल, परंतु इतर दुसऱ्या शेजारी राज्यांपेक्षा दुर्बल असेल तर शेजारी राज्यांच्या सामर्थ्याविषयी माहिती मिळविली जाते व त्याआधारे त्यासोबत संबंध निश्चित केले जातात. म्हणूनच माहिती दर्शक चलितांचा अभ्यास आंतरराष्ट्रीय संबंधाच्या अध्ययनात महत्वपूर्ण ठरतो.

### ड) मार्टन कॉप्लॉन यांचा सहा पद्धतींचा दृष्टिकोन

कॉप्लॉन यांच्या मते, आंतरराष्ट्रीय राज्यव्यवस्थेत राष्ट्रराज्यांची महत्वाची भूमिका आहे. परंतू राज्यांची भूमिका काळ व परिस्थितीनुसार बदलत असते. कॉप्लॉन यांनी आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या अभ्यासासाठी सहा प्रकारच्या पद्धती मांडल्या आहेत त्या पुढीलप्रमाणे आहेत.

### १) सत्ता संतुलन पद्धती

जगातील सर्वच प्रमुख राष्ट्रांचे सामर्थ्य सर्वसाधारणपणे समान असल्यास कोणतेच राष्ट्र दुसऱ्या राष्ट्रावर दडपण आणून त्याला नियंत्रीत करू शकत नाही. याला 'सत्ता संतुलन' असे म्हणतात. इ. स. १६४८ मध्ये राष्ट्र-राज्य व्यवस्थेला प्रारंभ झाला. तेव्हा कोणतीही केंद्रीय सत्ता नव्हती कोणतेही एकच राष्ट्र शक्तीशाली झाले तर सर्वांना त्याचा धोका होईल म्हणून इतर राष्ट्रे एकत्र येऊन ती बलाढ्य राष्ट्राविरूद्ध लढली. तेव्हापासून सत्ता संतुलन पद्धतीला सुरुवात झाली. ही पद्धती १७, १८ व १९ व्या शतकांत युरोपिय देशांत अस्तित्वात होती.

## २) अपूर्ण द्विधृवी व्यवस्था

जग दोन महासत्तांमध्ये विभागले असेल, त्या दोन बलवान राष्ट्रांत सतत स्पर्धा व विरोध सुरू असेल तर त्याला द्विधृवी व्यवस्था असे म्हणतात. अशावेळी जगाचे दोन गटांत विभाजन होते. तर ही दोन राष्ट्रे विचारप्रणालीच्या आधारे परस्परविरोधात उभी राहतात. अशावेळी जगातील दुर्बल राष्ट्रे स्वतःच्या रक्षणासाठी, विकासासाठी कोणत्यातरी गटांत सहभागी होतात. तर काही राष्ट्रे दोन्हीपैकी कोणत्याही गटांकडे न जाता तटस्थ राहतात. यालाच गटनिरपेक्ष / अलिप्तता असेही म्हणतात. त्यामूळे द्विधृवी स्थिती निर्माण होत नाही. यालाच कॉप्लॉन अपूर्ण द्विधृवी व्यवस्था किंवा विस्कळीत द्विधृवी व्यवस्था किंवा शिथिल द्विधृवी पद्धती असे म्हणतात.

## ३) निश्चित किंवा दृढ द्विधृवी पद्धती

कॉप्लॉनच्या मते, या पद्धतीत दोन राष्ट्रे शक्तीशाली / महासत्ता असतात. परंतु या व्यवस्थेत सामर्थ्याचे परिपूर्ण धृवीकरण झालेले असते. म्हणजे जगातील दूर्बल राज्यांपैकी काही राज्ये एका शक्तीमान राज्याच्या बाजूने तर उर्वरीत राज्ये दुसऱ्या शक्तीमान राज्याच्या बाजूने संघटीत झालेली असतात. तटस्थ राज्यांचा गट येथे नसतो म्हणून या अवस्थेला निश्चित किंवा दृढ निश्चित द्विधृवी व्यवस्था असे म्हणतात.

## ४) सार्वत्रिक आंतरराष्ट्रीय व्यवस्था

कॉप्लॉन याला विश्वात्मक संस्था पद्धती असे संबोधतात. तेव्हा राष्ट्रा-राष्ट्रांत परस्पर विश्वास व सौहार्दाचे वातावरण निर्माण होते आणि त्यांच्यात परस्पर सहजीवनाबाबत सहमती निर्माण होते. त्यावेळी आंतरराष्ट्रीय पातळीवर परस्परवाद व संघर्ष सोडवणूकीसाठी एका मध्यवर्ती संस्थेची निर्मिती केली जाते. ती संस्था प्रभावीपणे काम पाहते. त्यातून स्वतंत्र राष्ट्रांचे सार्वभौमत्व कायम राखून देखील आंतरराष्ट्रीय शांतता व सुव्यवस्था कायम राखण्याच्या दृष्टीने आर्थिक, न्यायिक, राजकीय, प्रशासकीय कामगिरी यशस्वीपणे पार पाडण्याचे कार्य ही संस्था करते. उदा. विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात निर्माण झालेल्या 'राष्ट्रसंघ' व 'संयुक्त राष्ट्र संघटना' या संस्था या प्रकारच्या व्यवस्थेच्या प्रतीक आहेत.

## ५) श्रेणीबद्ध आंतरराष्ट्रीय व्यवस्था

श्रेणीबद्ध आंतरराष्ट्रीय व्यवस्थेत राज्य सार्वभौम न राहता ती जागतिक समुदायात विलिन झालेली असतात. परिणामी राज्यांनी आपले सार्वभौतत्व जागतिक समुदायास बहाल केलेले असते. येथे एकच मध्यवर्ती सार्वभौम सत्ता उदयास आलेली असते. राज्यांचा दर्जा आता संघराज्यातील घटक राज्यांप्रमाणे असतो. त्यांना काही गोष्टीत स्वातंत्र्य असते. पण ते आता सार्वभौम नसतात म्हणजे ही विश्वराज्याची कल्पना आहे असेही म्हणता येते.

श्रेणीबद्ध आंतरराष्ट्रीय व्यवस्थेत एक मध्यवर्ती सत्ता असून विविध प्रांतिक विभागांच्या सत्तांची कनिष्ठ सत्ता अशी श्रेणीबद्ध व्यवस्था असते. अशा स्थितीत आंतरराज्य संबंधाचे स्वरूप पूर्णतः बदललेले असेल व त्यात निर्माण होणारे प्रश्न विनायुद्ध सहजपणे सोडवता येतील.

#### ६) घटक नकाराधिकार व्यवस्था

घटक नकाराधिकार व्यवस्थेत प्रत्येक राज्य सार्वभौम आहे. मध्यवर्ती यंत्रणा आहे परंतु तिच्याकडे सार्वभौमत्वाचे अधिकार नाहीत. ही मध्यवर्ती यंत्रणा आंतरराष्ट्रीय प्रश्नांवर चर्चा घडवून आणते. बहुमताने निर्णय घेते. परंतु त्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याचे सामर्थ्य मात्र या संघटनेकडे नाही. प्रमुख राज्यांनी साथ दिली तर या निर्णयांची अंमलबजावणी होऊ शकते. शिवाय तेथे राज्यांना नकाराधिकार असतो. अशा एका राज्याने जरी विरोध दर्शविला तरी निर्णय होऊ शकत नाही. ही अराज्यासारखी स्थिती आहे. आज जगातील उपलब्ध स्थिती याच्याशी बऱ्याच अंशी मिळती जूळती आहे.

कॉप्लॉनच्या मते, आंतरराष्ट्रीय संबंधातील चल घटक व उपलब्ध आंतरराष्ट्रीय व्यवस्था या विषयी खात्रीलायक माहिती उपलब्ध झाल्यास आंतरराष्ट्रीय संबंधाचे अध्ययन अधिक शास्त्रशुद्ध व भविष्यकालीन घडामोडींविषयी अंदाज घेण्यास अनुकूल बनेल.

### ई) मॉर्टन कॉप्लॉनच्या व्यवस्था सिद्धांताचे मूल्यमापन

कॉप्लॉन यांच्या आंतरराष्ट्रीय संबंधाच्या अभ्यासाविषयीचा व्यवस्था दृष्टिकोन तर्कशुद्ध व परिपूर्ण वाटत असला तरी त्यात काही उणिवा व दोष दिसतात. ते पुढीलप्रमाणे.

#### १) चलघटकांचा निर्देश परिपूर्ण नाही

काल्पनीय आंतरराष्ट्रीय संबंधातील चलघटकांचा जो निर्देश केला आहे तो परिपूर्ण नाही. कारण आंतरराष्ट्रीय संबंधांना प्रभावित करणाऱ्या सर्व चल घटीतांची माहिती मिळविणे अत्यंत कठीण आहे. ज्यांची माहितीच नाही त्यांचा प्रभाव विचारात कसा घेता येईल?

#### २) मानवी वर्तन व शास्त्रीय स्वरूप

मानवी वर्तणूक ही गुंतागुंतीची असते. त्याविषयी निश्चितपणे सांगणे शक्य नसते. अमुक परिस्थितीत माणसे अशी वागतील असा अंदाज फार तर व्यक्त करता येतो. पण माणसांचे वर्तन असे होईलच याची हमी देता येत नाही. म्हणजेच मानवी वर्तणुकीचे अध्ययन करणाऱ्या शास्त्रांना निश्चित शास्त्रांचे स्वरूप देण्याचे प्रयत्न यशस्वी होत नाहीत.

कॉप्लॉनच्या व्यवस्था दृष्टिकोनात वरील अडचणी असल्या तरी त्यामूळे या पद्धतीची विश्वसनीयता नष्ट होत नाही. शिवाय वरील दोष दूर करता येण्यासारखे आहेत. म्हणूनच व्यवस्था दृष्टिकोनाची लोकप्रियता हळूहळू वाढत आहे.

## २.२.३ खेळ सिद्धांत (Game Theory)

#### १) प्रास्ताविक

२० व्या शतकात सामाजिक शास्त्रांच्या अभ्यासाच्या ज्या विभिन्न पद्धती विकसित झाल्या आहेत. त्यात संख्याशास्त्रीय व गाणिती पद्धतींचा महत्वाचा वाटा आहे. या पद्धतीच्या सहाय्याने सामाजिक समस्येचे अध्ययन गणिती व संख्यात्मक दृष्टिने अधिक काटेकोर करण्याचा प्रयत्न झाला. यातीलच एक सिद्धांत म्हणजे खेळ सिद्धांत (Game Theory) होय. खेळ सिद्धांताचा विकास

प्रामुख्याने गाणितज्ञ व अर्थशास्त्रांज्ञानी केलेला आहे. इ. स. १७१० मध्ये सर्वप्रथम गणितज्ञ लिबनीझ यांनी युद्धनीतीच्या दृष्टिने या सिद्धांताचे प्रतिपादन केले. त्यानंतर १९ व्या शतकात एडज्वर्थ (Edesworth) यांनी आर्थिक प्रक्रिया व युद्धनीतीच्या दृष्टिने एका सिद्धांताचे प्रतिपादन केले एक नमुना मांडला.

इ. स. १९२८ मध्ये जॉन व्हॉन न्यूमन यांनी खेळ सिद्धांताचे महत्व प्रतिपादन करणारे प्रमेय मांडले. १९४४ मध्ये न्यूमन व आस्कर मार्गन्स्टर्न या दोघांनी आर्थिक क्षेत्राबाबतचा खेळ सिद्धांत मांडला. खेळ सिद्धांत म्हणजे परिस्थितीसापेक्ष व अनुरुप असे कोणते पवित्रे घ्यावेत याचे योग्य दिशादर्शक करणारा सिद्धांत असून ती एक विश्लेषणाची पद्धती आहे.

आंतरराष्ट्रीय राजकारणात खेळ सिद्धांताचे प्रतिपादन मार्टिन शुबिक व कार्ल डवाईश यांनी केले. आंतरराष्ट्रीय राजकारणातील दोन राष्ट्रांना किंवा बाजूंना दोन परस्परविरोधी संघांप्रमाणे समजून त्यांनी एकमेकांच्या हालचालींचा अंदाज घेऊन ते डावपेच विफल करण्याचा प्रयत्न करणे तथा आपल्या हालचाली निश्चित करणे ही जी प्रक्रिया असते. त्याला एखाद्या खेळाचे स्वरूप देऊन त्या पद्धतीने या प्रक्रियेचा अभ्यास केला. म्हणून त्यास आंतरराष्ट्रीय संबंधाच्या अभ्यासाचा खेळ सिद्धांत असे म्हटले आहे.

### २) खेळ सिद्धांताची गृहीत तत्वे

खेळ सिद्धांत प्रामुख्याने पाच गृहीत तत्वांवर आधारित आहे. ती गृहीत तत्वे पुढीलप्रमाणे.

### १) संघर्ष

आंतरराष्ट्रीय पातळीवर दोन परस्परविरोधी शक्ती किंवा राष्ट्रे यांच्यात संघर्ष असतो आणि अशी संबंधित दोन परस्परविरोधी राष्ट्रे म्हणजेच त्यांनी मान्य केलेल्या खेळातील दोन परस्परविरोधी बाजू आहेत.

### २) खेळाचे नियम

ज्याप्रमाणे खेळाडूंच्या दोन्ही चमू खेळासंबंधी काही निश्चित नियम ठरवितात. त्याचप्रमाणे खेळ खेळणारी राष्ट्रे आपली स्थिती आणि शक्तीचा विचार करुन नियम तयार करतात. त्यांनाच आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या खेळाचे नियम असे म्हणतात.

### ३) सूचना प्राप्ती / माहिती मिळविणे

ज्या राष्ट्राशी संबंध निर्माण करायचे असतात त्या राज्यातील अंतर्गत स्थिती, आर्थिक, तांत्रिक, सैनिकी शक्तींचा अभ्यास आपल्या गुप्तचर विभागाद्वारे केला जातो. यालाच सूचनाप्राप्ती किंवा माहिती मिळविणे असे म्हणतात. ही सूचना प्राप्ती परराष्ट्र धोरण ठरविताना उपयुक्त ठरते.

### ४) युद्धनीती

शत्रूराष्ट्रातील युद्धनीतीचा अभ्यास अशा खेळाडूंच्या माध्यमातून करण्यात येतो. तेथील लोकांच्या वर्तणूकीचा अभ्यास करणे, या राष्ट्रांमध्ये युद्ध झाल्यास त्याच्या संभाव्य परिणामांचा

अभ्यास करणे, शत्रूराष्ट्रांच्या हालचाली लक्षात घेऊन आपली युद्धविषयक, सैन्यविषयक धोरणे ठरविणे ही कार्ये खेळाच्या आणि खेळाडूंच्या माध्यमातून साध्य केली जातात.

**५) मूल्यमापन**

त्या दोन राज्यांत युद्ध झाल्यास किती लाभ अगर हानी होईल याचे अनुमान काढण्यात येते. त्याला खेळाचे मूल्यमापन असे म्हणतात.

अशा प्रकारे खेळ सिद्धांताचे संघर्ष, खेळाचे नियम, सूचना प्राप्ती, युद्धनीती व मूल्यमापन ही महत्वाची तत्वे असतात. ज्यांच्या सहाय्याने दोन राष्ट्रांतील संबंधाचा अभ्यास केला जातो.

**३) खेळाचे स्वरूप**

खेळ सिद्धांतात खेळाच्या तीन पद्धती दिसून येतात. ज्यात हितसंबंधाचे खेळ, परस्पर विरोधी हितसंबंधाचे खेळ व संमिश्र हितसंबंधाचे खेळ यांचा समावेश होतो.

१) हितसंबंधाचे खेळ समजूतदार खेळाडूंद्वारे व सहकार्याच्या तत्वावर खेळले जातात.

२) परस्परविरोधी हितसंबंधी खेळात खेळाडूंचे सहकार्य मिळणे अशक्य असल्याने परस्परांवर दबाव आणण्याचा प्रयत्न केला जातो.

३) तिसऱ्या पद्धतीत वरील दोन्ही प्रकारच्या संबंधाचा समावेश होतो. कारण त्यात सहकार्य व विरोधी तत्वांचा अंतर्भाव केला जातो. म्हणून त्याला संमिश्र हितसंबंधी खेळ म्हणतात.

**४) खेळाचे प्रकारः प्रतिमाने**

प्रामुख्याने खेळाचे तीन प्रकार आहेत.

**१) शून्य योग खेळ** (Zero Sum Game)

खेळातील एका पक्षाला दुसऱ्या पक्षाने पूर्णपणे नष्ट करून विजयी होणे यालाच शून्य योग खेळ असे म्हणतात. या खेळात संघर्षाचे स्वरूप पूर्णपणे निर्णायक असते. संघर्ष मिटविण्यासाठी खेळातील दोन्ही पक्ष जीवाची बाजी लावतात. आपली ताकद पणाला लावून हे खेळ खेळले जातात. त्यासाठी अनेक तंत्रांचा वापर केला जातो आणि ही तंत्रे गुप्ततेने वापरली जातात. असा खेळ सर्वंकष व अमर्यादित युद्ध अवस्थेतच खेळला जातो.

**२) सतत योग खेळ** (Coustance Zero Sum Game)

जेव्हा एक पक्ष किंवा गट दुसऱ्या पक्षाचे कोणतेही नुकसान होऊ न देता स्वतः जास्तीत जास्त लाभ प्राप्त करून घेण्याचा प्रयत्न करीत असतो त्या खेळात प्रतिस्पर्ध्याचे नुकसान करणे व त्याच्याशी संघर्ष करणे आवश्यक नसून प्रतिस्पर्ध्यासोबत सहकार्य व सलोख्याचे संबंध निर्माण करण्याचा प्रयत्न केला जातो.

**३) अशून्य योग खेळ** (Non- Zero Sum Game)

या खेळात दोन्ही गट जेव्हा परस्परांशी सहकार्य व संघर्ष अशा दोन्ही स्वरूपाच्या संबंधाचा वापर करून आपले हित साध्य करण्याचा प्रयत्न करतात तेव्हा त्या खेळात अशून्य योग खेळ म्हणतात.

ज्या वेळेस खेळात दोनपेक्षा अधिक खेळाडूंचा अंतर्भाव होतो त्यावेळी कोणाचे किती नुकसान किंवा लाभ झाला हे जाणणे कठीण असते. जेव्हा खेळात दोनपेक्षा जास्त खेळाडू भाग घेतात त्यावेळी त्यांच्यात सहमिलन किंवा यूती होते व त्यातूनच स्वतःचा लाभ करून घेण्याचा प्रयत्न खेळाडू करीत असतात.

खेळ सिद्धांतात खेळाचे अंतिम उदिष्ट हे राष्ट्रीय हितसंबंधाची प्राप्ती किंवा पूर्ती असून त्यादृष्टिने आर्थिक, राजकीय, लष्करी व सामाजिक क्षेत्रांमध्ये लाभ मिळविण्याचा प्रयत्न केला जातो.

**५) खेळ सिद्धांताची वैशिष्ट्ये**

आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या अध्ययनाच्या खेळ सिद्धांताची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत.

**१) आंतरराष्ट्रीय राजकारण एक खेळ**

खेळ सिद्धांताच्या पूरस्कर्त्यांनी आंतरराष्ट्रीय राजकारणाला सत्ता मिळविण्यासाठी चाललेला शह प्रतिशहाचा खेळ समजतात. राष्ट्रे या खेळातील खेळाडू मानतात. या खेळाचे विशिष्ट नियम असतात. त्यातून प्रत्येक राष्ट्र आपले हितसंबंध जोपासण्याचा प्रयत्न करत असते. चार्लसवर्थ हे आंतरराष्ट्रीय राजकारणाला बुद्धीबळाचा खेळ समजतात. या खेळात अचूक चाली खेळाव्या लागतात. एक चाल चुकली तर त्याचे त्वरित परिणाम पराभवाच्या रूपात राष्ट्राला भोगावे लागतात.

**२) रणनीतीचे विश्लेषण**

सत्ता मिळविण्यासाठी, फायद्यासाठी राष्ट्रे रणनीती आखतात. डावपेच, चाल ठरवितात. यात प्रतिस्पर्ध्याची दुर्बलता, शक्तीस्थाने लक्षात घेतली जातात. राष्ट्रे कोणत्या प्रकारची रणनीती निवडतात. यावरून त्यांचे परिणाम काय होतील हे सांगणे शक्य असल्यामुळे अशा रणनीतीचे विश्लेषण खेळ सिद्धांतामध्ये केले जाते. राष्ट्रे अधिकाधिक फायदा मिळवून देणारी रणनीती निवडतात. ज्यावेळी राष्ट्रे तर्कशुद्ध रणनीतीचा वापर करतात तेव्हा स्पर्धेतील त्यांचा फायदा निश्चित असतो.

**३) तर्कसंगत वर्तनाची तत्वे ठरविणे**

सत्ताप्राप्तीसाठी राष्ट्राकडून तर्कसंगत वर्तनाची अपेक्षा असते. तर्कसंगत वर्तन म्हणजे असे वर्तन की त्यात उपलब्ध पर्यायातून असा पर्याय निवडला जातो की, ज्यामुळे राष्ट्राला अधिक फायदा होऊ शकतो. अशी रणनीती ठरविण्यासाठी प्रतिस्पर्ध्याच्या रणनीतीचा सखोल अभ्यास करावा लागतो. खेळ सिद्धांताचे पुरस्कर्ते भिन्न परिस्थितीत तर्कसंगत वर्तनाची तत्वे ठरविण्याचा प्रयत्न करतात. या तत्वांच्या आधारावर वर्तनाच्या सामान्य वैशिष्ट्यांचा अभ्यास करतात व नफ्या-तोट्याची गणिते मांडतात.

### ४) निर्णय प्रक्रियेचे विश्लेषण

निर्णय प्रक्रियेचा अभ्यास किंवा विश्लेषण करणारी पद्धती म्हणजे खेळ सिद्धांत होय. त्यात स्पर्धेवर आधारीत निर्णयांचा अभ्यास केला जातो. विशिष्ट परिस्थितीत राष्ट्राचे वर्तन जर तर्कसंगत असेल तर राष्ट्रे कोणत्या प्रकारचा निर्णय घेऊ शकतात याचा अंदाज या सिद्धांताचा वापर करून काढता येतो. सहकार्य व संघर्षाच्या परिस्थितीत व्यक्ती, व्यक्ती समूह किंवा राष्ट्र जे निर्णय घेतात त्या निर्णयाच्या निर्मिती प्रक्रियेचा अभ्यास खेळ सिद्धांतात केला जातो.

### ५) नफ्यातोट्याचे संख्यात्मक मोजमाप

खेळ सिद्धांतात राष्ट्राने घेतलेल्या विशिष्ट निर्णयाच्या नफ्यातोट्याचे संख्यात्मक मोजमाप केले जाते. सांख्यिकी करणाच्या या प्रक्रियेसाठी गाणितातील तर्कपद्धतीचा वापर केला जातो. संख्यात्मक मोजमापात निर्णयाच्या परिणामाचा अंदाज राष्ट्रांना येऊन अचूक निर्णय घेण्यास मदत होते. संख्यात्मक मोजमापाच्या पद्धती स्पर्धेतील खेळाडूंच्या संख्येनुसार बदलत जातात. राष्ट्रांना संरक्षण क्षेत्रातील रणनीती ठरविताना अशा संख्यात्मक मोजमापाचा फायदा होतो.

### मूल्यमापन

खेळ सिद्धांताचा वापर परराष्ट्र धोरण आखताना होत आला आहे. शीतयुद्ध काळात अमेरिका व सोव्हिएट रशियाने आखलेली परस्परविरोधी रणनीती ही खेळ सिद्धांतावर आधारलेली होती. दहशतीचा समतोल हा खेळ सिद्धांताचाच प्रकार असून शीतयुद्धकालीन द्विध्रुवीकरणावर आधारित सत्तासमतोलाचे ते एक महत्वपूर्ण वैशिष्ट्य होते. शीतयुद्धोत्तर काळातही अनेक विभागीय संघर्षामध्ये खेळ सिद्धांताचा अवलंब राष्ट्रे आपली रणनीती ठरविताना करत आहेत.

असे असलेतरी खेळ सिद्धांतावर पुढीलप्रमाणे टीकाही केली जाते.

१) खेळ सिद्धांताचा सिद्धांत म्हणून वापर होण्यासाठी आवश्यक अनुभवनिष्ठ गृहितकांचा विकास झालेला नाही. त्यामुळे काही अभ्यासक खेळ सिद्धांत म्हणण्याऐवजी दृष्टीकोन म्हणतात. तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवरील सत्ता संघर्षाचे स्वरुप जाणून घेण्यासाठी हा सिद्धांत अपूरा आहे.

२) आंतरराष्ट्रीय राजकारणाशी इतर खेळाची तुलना करणे अवघड आहे. इतर खेळात खेळाडू हरला तरी खिलाडूवृत्ती दाखवून तो पराभव पचवू शकतो. पण राष्ट्रांच्या बाबतीत तेच गणित लागू पडेल, असे सांगता येत नाही.

संध्या आंतरराष्ट्रीय पातळीवर राष्ट्रांची संख्या २०० च्या आसपास आहे. या राष्ट्रांत द्विपक्षीय तसेच बहुपक्षीय पातळीवर एकाच वेळी अनेक खेळ चालू असतात. या खेळांची तुलना एक दुसऱ्याशी करता येत नाही. तसेच सर्वच खेळांसाठी एकच सामान्य नियमावली बनविणे अवघड आहे.

३) एकाच प्रकारचे नियम वापरून राष्ट्रांच्या निर्णयाच्या परिणामांचे सांख्यिकीय मोजमाप मार्टिन शूबिक यांना अवास्तव वाटते. कारण प्रत्येक राष्ट्राची मूल्ये भिन्न असतात.

४) प्रत्येक खेळाला शेवट असतो. तथापी आंतरराष्ट्रीय राजकारणातील सत्ता संघर्षाच्या खेळाला शेवट नाही. ही एक निरंतर प्रक्रिया आहे.